स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

“बंजारा समाजाचे संविधानिक मानवी हक्क त्यांची सद्यस्थिती : एक चिकित्सक अभ्यास विशेष संदर्भ नांदेड जिल्हा”

मानव्यविद्या शाखेअंतर्गत राज्यशास्त्र विषयातील विद्यावाचस्पती (Ph.D) पदवीसाठी सादर करावयाच्या शोध प्रबंधाचा प्रारंभीक आराखडा

संशोधक

राठोड मनोज भिकु

एम. ए., सेट (राज्यशास्त्र)

स्वा.रा.ती.म.वि. नांदेड

: मार्गदर्शक :

डॉ. मानवते यु.एच.

प्राध्यापक,राज्यशास्त्र विभागप्रमुख

M.A.,NET,Ph.D

बी.पी.ई. महाविद्यालय

हानेगाव जि. नांदेड

: अभ्यासकेंद्र :

देगलुर कॉलेज, ता. देगलुर जि. नांदेड

वर्ष २०२२

“बंजारा समाजाचे संविधानिक मानवी हक्क त्याचे सद्यस्थिती : एक चिकित्सक अभ्यास विशेष संदर्भ नांदेड जिल्हा”

प्रस्तावना :

“एनसक्लोपिडिया ऑफ रिलीजन्स अँड इथिक्स भाग -२” नुसार ‘बंजारा’ शब्द हा संस्कृत या शब्दापासून बनतो. त्याचा अर्थ व्यापारी पाणी असा होतो सिधू संस्कृतीच्या काळामध्ये या काळच्या व्यापाऱ्यांना पाणी असे म्हणत असत. पाणी या शब्दापासून ‘पणिक’, ‘बाणिक’, ‘वणी’ असे शब्द पुढे बनले. त्यामुळे ते मूलनिवासी भारतीय पूर्वी पासूनच व्यापारामध्ये होते पुढे चालून वणी, मनी, वणी, बंजारा इ. वेगवेगळ्या नावांनी ओळखल्या जावू लागले संस्कृत शब्द ‘वन’ म्हणजे ‘जंगल’ आणि ‘चरा’ म्हणजे भटकरणारा ‘वनचरा’ शब्द पुढे चालून वचरा, बंजारा आणि वाचरा म्हणजेच वनात भटकणार मानव असा बनला. त्याचप्रमाणे संस्कृतमध्ये वन म्हणजे जंगल वन हाच शब्द बन बनला. त्यावरुनच वनचराचे बंजारा पुढे वचरा आणि त्यापुढे बंजारा असे नाव पडले. बंजारा शब्द हा साधारणपणे भटक्या जमातिसाठी वापरला जातो. अशा जमाती राजस्थान, उत्तर पश्चिम, गुजरात, पश्चिम, मध्यप्रदेश, आंध्रप्रदेश, महाराष्ट्र, मद्रास आणि पाकीस्थानातील पूर्व सिंध प्रांतात आढळतात. बंजारा, वंजारी, भोर, धौरी, जाट आणि जिट सींहे पूर्वी कोण होते त्या पुस्तकात डॉ. प्रताप चाटसे लिहतात त्याच्या मुख्य व्यवसाय व्यापार आणि शेती जोकी प्रांताच्या साह्याने मुख्यत: गाई बैलाच्या मदतीने चालत. असे आपल्या व्यवसायासाठी ते या प्रांताचे संरक्षण व सवर्धन करीत असत. संस्कृतमध्ये ‘गो’ म्हणजे ‘गाय’ आणि ‘र’ म्हणजे ‘संरक्षण’ करणे हे लोक ‘गाईचे संरक्षक’ व सवर्धक असल्यामुळे त्यांना पुढे चालून ‘गोर’ हे नाव पडले.

आर्याच्या आगमनानंतर मनुस्मृतीच्या नियमानुसार गाई, बैलाच्या साह्याने जमिनीवरुन व्यापार करणाऱ्या बंजारावर बंधने आली. इस्लामच्या आक्रमनानंतर धान्य पुरवणाऱ्या व्यापाऱ्यांना ‘बंजारा’ म्हणवू लागले. मोगलाच्या अस्तानंतर भारतात बिटिशांचे राज्य आले. ब्रिटिशांनी आणलेल्या तंत्रज्ञानामुळे पारपांरिक बैलाच्या साह्याने चालणारा व्यापार बंद पडला. त्यामुळे आपला उदरनिर्वाह चालवण्यासाठी

श्रीमंत जमिनदान लोकांची संपत्ती लुटून कुटुंबियाचे पालन करण्याशिवाय त्याच्याकडे पर्याय नव्हता. त्यामुळे १८७५ मध्ये 'गुन्हेगारी प्रतिबंध कायदा' करण्यात आला.त्याच्या अंतर्गत 'बंजारा' त्याच्याशी अजुनही चिकटलेली आहे.

गोर बंजाराना त्याची स्वत:ची भाषा आहे त्याला 'गोर भाषा' म्हणतात.तिलाच 'गोरबोली' किंवा 'बंजाराबोली' असेही म्हणतात.ती आर्याच्या संस्कृत भाषे पासून भिन्न आहे. गोर बंजारा लोकांनी सिंधु संस्कृतीमध्ये असलेला लोक धर्म अजुनही जतन करुन ठेवलेला आहे. त्याच्या सिधूकालीन पूर्वजाप्रमाणे ते निसर्ग पूजक आहेत. तांडा ही बंजारा लोकांची **आर्य** व्यवस्थेपासून दूर अशी वस्ती आहे. त्यांनी आपण निसर्गरजक धर्म आजपर्यंत जपलेला आहे. या जमातीतील वद्ध व्यक्ती आमचा धर्म गोरमाटी आहे असे अभिमानाने सांगतात.

मेतिराज राठोड त्यांच्या म्हणण्याप्रमाणे इ.स. पहिल्या शतकात अफगाणिस्तानमध्ये काबुल ते हिशन या प्रदेशामध्ये गोर जमातीची राज्य होती त्यामुळे त्या भागातील डोंगराळ पट्टयात गोर जात असे म्हणतात. त्या भागामध्ये अजूनही गोर जमाती निवास करतात. त्यांच्या वस्त्यांना तांडे असे म्हणतात. त्या भागातुन एक नदी वाहते त्यानदीला गोर नदी म्हणतात. तेथे गोर नावाचे शहर देखील अस्तित्वात आहे. अफगानिस्तानमधील गोर स्थनालाच मुदस्थान म्हटल्या जायचे.

सन १८७१ मध्ये गुन्हेगार जमाती कायदा लागू होतो. ही आदीवासी आणि भटक्या जमातीच्या इतिहासात सर्वात दु:खद घटना आहे. त्यामुळे त्या लोकांवर जन्मजात: गुन्हेगारीचा शिक्का लागला. जर या कायद्याच्या भंग केल्यास वारंट न देता अटक करण्यात यावे. असे या कायद्यात सुचविले होते सध्या भारतात भटक्या जमातीचे ६० कोटी लोक असून सन १८८५ पासून ते 'जन्मजात गुन्हेगार' या लाकांमुळे त्रस्त आहे. त्यांच्यावरील तो कलंक पुसुन काढण्यासाठी सन १९५२ बदलुन CTA कायदा HOA कायदा केला. तरी पण पोलीस त्यांना जन्मजात गुन्हेगार समजत असते. त्यांना सर्व जगण्याच्या साधनापासुन दूर ठेवण्यात येते.

आजही बंजारा समाजाच्या तांड्यावर चांगले रस्ते नाहीत. पिण्याचे स्वच्छ पाणीही विज नाही शाळा नाही. आरोग्याच्या सुविधा नाहीत.त्याच्यामध्ये मृत्युदरांचे प्रमाण अधिक आहेच. शिक्षण नाही कायद्याचे ज्ञान नसल्यामुळे त्यांना सतत पोलीसांच्या दबावाखाली जिवन जगत असतात.

बंजारा समाजाची अर्थव्यवस्था शेतीवर अवलंबून आहे. शेती व पशुपालन त्याचे मुख्य व्यवसाय आहेत. शेतीक्षेत्र अत्यंत लहान असल्याने बंजारा समाजातील स्त्रियांना दुसऱ्यांच्या शेतीवर शेतमजुर म्हणुन काम करावे लागते त्यांची पिळवणुक शेतीवरील मुकदम ठेकेदार व मोठे शेतकरी करतात. बऱ्याचदा त्याना कामाचा मोबदला तर दिला जात नाहीच परंतु स्त्रियांना प्रचंड शारिरिक शोषण करण्यात येते. त्यांच्या मुलाना सलग शिक्षण घेता येत नाही कारण शेतीतील कामासाठी त्यांना जवळच्या गावी जावे लागते.

मानवी हक्काची व्याख्या :

१) प्रो.एच.जे. लास्की : यांच्या मते हक्क म्हणजे सामाजिक जीवनाची अशी परिस्थीती होय की, ज्याशिवाय व्यक्तीला सामान्यत: स्वताचा सर्वांगिण विकास करुन घेणे शक्य नाही

२) प्रा.बोझीके यांच्या मते : आपण ज्या समाजाचे घटक असतो त्या समाजाच्या सर्वोच्च कल्याणाच्या दिशेने आपल्या जीवनाचा विकास घडवून आणण्यासाठी आवश्यक असणारी साधने म्हणजे हक्क होत

३) रा.एच.ग्रीन याच्या मते : मानवाच्या आंतरिक विकासाच्या साठी आवश्यक असलेली बाह्य परिस्थिती म्हणजे हक्क होत पुढे जावून ते असे म्हणतात की मानवी जागृती स्वातंत्र्याची मागणी करते स्वातंत्र्यासाठी हक्कांची गरज भासते आणि हक्कांच्या रक्षणासाठी राज्य आवश्यक असते.

बंजारा जमातीच्या समस्या भटक्या विमुक्त जमातीच्या प्रमुख समस्या पुढीलप्रमाणे

जाती पंचायतीचे अधिराज्य :

बंजारा सतत भटकती करावी लागते त्यामुळे सगळ्यांनी कुठे एकत्रीत यायचे हे ठरविले जाते पंचमुखी परमेश्वरा या न्यायाने ही जाती पंचायत कारभार चालवते यामध्ये जातील वयोवृद्ध पुरुषांचा समावेश असतो. मानवाची प्रतिष्ठा हनन करणाऱ्या शिक्षा दिल्या जात त्या भोगायलाच लागत होत्या अन्यथा वाळीत टाकला जात असे. उपराकारानी आंतर जातीय विवाह केल्यामुळे कुटुंब नातेवाईक

जमातीने जाती पंचायतीचा निर्णय मान्य करुन बहिष्कार टाकण्यात आला देशात २६ जानेवारी १९५० पासुन संविधान अमलात असुन ही बंजारा जातीयतीच्या हुकुमशाहीला जाचाला समोरे जावे लागत.

शैक्षणिक समस्या :

बंजारा जमातीतील पारंपारीक समाजात शिक्षणाचे महत्व नसल्यामुळे सतत भटकंती करावी लागत असल्याने मुलांना एकाच शाळेत वर्षभर टिकुण राहणे अवघड जाते. त्यामुळे कोणीही आग्रहाने शिक्षण घेणे टाळतात त्यामुळे निरक्षरता अधिक प्रमाणात दिसुन येते.

आर्थिक समस्या :

अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, आरोग्य ह्या समस्या समाज व्यवस्थेने बंजारा समाजाला वारसा हक्काने मिळाल्यामुळे पुरुसे अन्न अंगभर वस्त्रे चांगले आरोग्य राखण्यासाठी उत्तम आहार औषध उपचाराच्या ऐवजी अंधश्रद्धाचे पालन यामुळे कुपोषण भुक रोगराई शाळेतील गळतीचे प्रमाणे अधिक आढळुन येते. शिक्षण घेण्याची इच्छा असणारे विद्यार्थी दारिद्र्यामुळे फीस भरु शकत नाहीत पारंपारीक व्यवसायात उत्पन्न नगण्य असल्यामुळे उपासमार व दारिद्र्यात जीवन जगावे लागते.

सतत भटकंती समस्या :

देशाला स्वातंत्र्याप्राप्त होवुन ७० वर्षापेक्षा अधिक कालखंड झाला असला तरी बंजारा उसतोड कामगार रोज कित्येक किलोमीटर प्रवास करुन एका गावावरुन दुसऱ्या गावाकडे सतत भटकंती करावी लागते. त्यामुळे पावसाळ्यात काम मिळत नसल्यामुळे उपासमार होते.

व्यसनाधिनता व अंधश्रद्धा :

बंजारा जमातीमध्ये अंधश्रद्धेचे प्रमाण अधिक आहे त्यामुळे शिक्षणाचे महत्व पटत नाही अधिक जातीचे व्यवसाय अतिश्रम भटकंती मनोरंजक साहस यावर आधरीत असल्यामुळे श्रम परिमार्जनासाठी दारु तंबाखू आदी व्यसनाचा सर्रास वापर होताना दिसतो.अंधश्रद्धेमुळे यात्रा, जत्रा, सण, समारंभ या वरील अधिकचा खर्च केला जातो त्यामुळे दारिद्र्यात भर पडते.

संशोधनाचे उद्दिष्टे :

१) महाराष्ट्रातील बंजारा समाजाचे स्वरुप समजुन घेणे.

२) महाराष्ट्रातील बंजारा समाजाचे मानवी हक्क जाणुन घेणे.

३) बंजारा समाजाच्या समस्येवर उपयाययोजना सुचवणे.

४) बंजारा समाजाच्या योग्य राजकी प्रतिनिधीत्वासाठी लोकसंख्याप्रमाणात नेतृत्व आहे का ? हे अभ्यासणे

५) बंजारा समाजाचे सर्वांगीण उन्नतीसाठी उपाययोजना सुचवणे.

गृहितकृत्ते

१) बंजारा समाजाच्या मानवी हक्काचे उल्लंघण होत आहे.

२) बंजारा समाजात सामाजिक आर्थिक राजकीय शैक्षणिक समस्या मोठ्या प्रमाणात आहेत.

३) लोकसंख्येच्या प्रमाणात बंजारा समाजास योग्य राजकीय प्रतिनिधित्व मिळालेले नाहीत.

४) बंजारा समाज आधुनिक समाजापेक्षा खुप मागासलेला आहे.

५) बंजारा समाजावर जागतीकीकरण आद्योगीकरण आणि पाश्चीमात्यी करण याचा परीणाम झालेला आहे.

अध्ययन क्षेत्र :

१) प्रस्तुत संशोधन विषयासाठी महाराष्ट्र राज्यातील नांदेड जिल्हा त्यातील बंजारा समाज अधिक असलेल्या तालुक्यांचा समावेश करण्यात आलेला आहे.त्यात प्रामुख्याने किनवट, माहुर,कंधार,मुखेड इ. तालुक्याचा समावेश आहे.

संशोधन आराखडा :

संशोधन आराखड्यात येणाऱ्या अडचणींचे आगोदर नियोजन करुन त्याची आणखी करणे म्हणजे संशोधन आराखडा ाहोय संशोधनात समस्येची निवड एक रुपता आणि स्पष्टीकरणानंतर संशोधन आराखडयाचा प्रश्न अस्तित्वात येतो प्रत्येक संशोधनाचे निश्चित लक्ष व उद्दिष्टे असते या लक्ष व उद्दिष्टांच्या पुर्तीसाठी संशोधनाबदल विषय वस्तुचे विभिन्न पैलू अन्वेषित केले जातात. अशा अन्वेषणासाठी उपयोगात आणलेली योजना म्हणजेच संशोधन आराखडा होय.

प्रस्तुत संशोधनासाठी आराखड्याच्या प्रकारापैकी ऐतिहासीक संशोधन आराखडा व अन्वेषणात्मक संशोधना आराखडा उपयोगात आनला आहे.

ऐतिहासीक संशोधनाचे स्वरुप विषद करताना हान्थगर्थ लिहतात की प्रत्येक सामाजिक संरचनेच्या प्रतिकृतीती सामाजिक इतिहासात्मक बदलाचा प्रतिध्वनी विहित असतो सामाजिक संरचनेत झ ाालेले बदल इतिहासात समातिष्ट केले जातात.

अन्वेषणात्मक संशोधन आराखड्यासंबंधी सेल्टीझ जहोडा आणि ाइतर त्याच्या मते अधिक निश्चित अशा संशोधना संबंधीत गृहीतकात्याच्या निर्मितीत तथ्य साहय्यक ठरतील अशा अनुभवाना प्राप्त करण्यासाठी अन्वेषणात्मक संशोधन आवश्यक आहे.

नमुना निवड :

समाजशास्त्रीय शबदकोषा प्रमाणे एका निश्चीत संख्येमध्ये व्यक्ती व्यष्टी किंवा निरिक्षणास एका विशिष्ठ सामग्रातुन काढण्याची प्रक्रिया किंवा पद्धती तसेच अध्ययनाच्या हेतुने एका समग्रातुन एका भागाची निवड म्हणजे नमुना निवड पद्धती होय.

प्रस्तुत संशोधनासाठी नमूना निवड पद्धतीतील गैर संभाव्य नमुना निवड पद्धतीचा उपयोग करण्यात आलाआहे ज्यावेळी समग्रामील सर्व एककांची नमुन्यामध्ये निवड होण्याची शक्यता किंवा संभाव्यता असते तेंव्हा त्यास गैरसंभाव्य नमुना निवड पद्धती म्हणतात या पद्धतीत संशोधक आपल्या इच्छेनुसार नमुना निवड करित असतो.

तथ्य संकलन :

अन्य शास्त्राप्रमाणेच सामाजिक या ज्ञानेंद्रीयांच्या आधारे होणारा स्थितीबोध वा निरीक्षण हाच तथ्य प्राप्तीचा आधार आहे. आपल्या ज्ञानेद्रीयावर आघात करणाऱ्या गोष्टीमुळे आपणास झालेल्या संवेदनाची नोंद म्हणजेच तथ्य होय प्रस्तुत विषयाच्या संशोधना संबंधीत तथ्याचे संकलन करण्यासाठी तथ्य संकलनाच्या प्राथमिक तंत्रातील मुलाखत अनुसुची निरीक्षण इत्यादी तंत्राचा तसेच बंजारा समाजाच्या मानवी हककासंबधी, राजकीय प्रतिनिधीत्वा संबंधी , योजना संबंधी लिखीत साहीत्य शासकीय दस्ताऐवज वर्तमानपत्रे मासिक ग्रंथ भारत सरकार अधिनियम इत्यादीचा आधार घेण्यात आलेला आहे.

तथ्याचे विश्लेषण व निर्वाचन :

दुय्यम तथ्याच्या विश्लेषणासाठी आशय विश्लेषण या तंत्राचा उपयोग करण्यात आला. समाजशास्त्र पॉलिन यंग यांच्या मते मुलाखत प्रश्नावली अनुसुची आणि इतर लिखित वा मौखिक भाषा विषयक अभिव्यक्तीद्वारे संशोधन तथ्यांचे आशयाचे क्रमबद्ध वस्तुनिष्ठ आणि परिणामात्कम वर्णन करण्यासाठी उपयोगात आणले जाणारे संशोधन तंत्र आशय विश्लेषण होय.

तथ्यांचे विश्लेषण व तथ्यांचे निर्वचण या दोन्ही प्रक्रिया एकमेकामध्ये पुर्णपणे मिसळुन गेलेल्या दिसतात तथ्य विश्लेषण हे जर तथ्याचे विशिष्ट प्रकारे करण्यात येणारे संघटन असेल तर अशा संघटनेच्या मागील मार्गदर्शन तत्वे निर्वचनात्मक कल्पनाच असतात विश्लेषणाची परिणीती जर सामान्य स्वरुपाच्या निष्कर्षाच्या मांडणीत होत असेत तर संशेधनकर्त्यास हे जाणून घ्यावयाचेअसते की त्यानी काढलेल्या निष्कर्षाचा वास्तविक अर्थ काय होतो अथवा या निष्कर्षामधुन काय प्रतिबिंब होते निर्वचन हेच जाणुन घेण्याचा एक मार्ग असल्याने खऱ्या अर्थाने निर्वाचना खेरीज विश्लेषाणाच्या कार्याची सांगता होतना ही म्हणुनच प्रस्तुत संशोधनामध्ये तथ्याच्या विश्लेषण बरोबरच निर्वचानासाठी अवलंब करण्या आला.

सारणीकरण :

प्रस्तुत विषयाचे अध्ययन करतांना संशोधकाने सारणीकरण पद्धतीचा अवलंब केला आहे. प्राथमिक व दुय्यम तथ्य संकलानानंतर मिळविलेल्या प्राथमिक व दुय्यम तथ्य संकलनानंतर मिळविलेल्या माहितीचे सांकितिकरणाद्वारे वर्गीकरण करुन सारणीकरण करण्यात आले आहे संशोधन व गृहीतकृत्ये समोर ठेवुन सारणीकरण महत्वाचे ठरते संकलीत तथ्याचे सारणीकरण करताना सांख्यिकीय साधने म्हणुन बेरीज गुणाकार भागाकार वजाबाकी आदिंचा वापर करण्यात आला, दोन चलांतील सहसंबंध स्पष्ट करण्यात आला.

संशोधन मर्यादा :

प्रस्तुत शोध निबंधाचा विषय बंजारा समाजाचे मानवी हक्क एक चिकित्सक अभ्यास विशेष संदर्भ नादेड जिल्हा आहे. त्यामुळे अभ्यासांचे क्षेत्र मर्यादित आहे तेव्हा संशोधनाअंती निघालेले निष्कर्ष हे देशातील इतर सर्व ठिकाणी लागु पडतील असे नाही हे संशोधन समता सैनिक दलाची पुर्णत: वस्तुस्थिती असे नाही.

साहित्य संदर्भ पद्धत :

संशोधन प्रबंधास संदर्भ देण्यासाठी समाजशास्त्रात जागतिक पातळीवर वापरल्या जाणाऱ्या ए.एस.ए. च्या चौथ्या आवृत्तीच्या मार्गदर्शन सुचना नुसार आडनाव नाव आणि वर्षे या पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे.

प्रकरणाची रुपरेषा :

प्रकरण : प्रास्ताविक व साहित्य सर्वेक्षण :

साहित्य सर्वेक्षण या प्रकरणामध्ये विषयास विषयास अनुसरुन उपल्बध लिखीत साहित्याचे सर्वेक्षण करण्यात आले. या प्रकरणात बंजारा व समाज संशोधीत व प्रकाशित झालेल्या पीच.डी. संशोधन प्रबंध संशोधन पेपर मासिके संदर्भ ग्रंथ सरकारी अहवाल व इतर प्रकाशित साहित्याचा आढावा घेण्यात येणार आहे.

प्रकरण दुसरे : अध्ययन पद्धती :

सदरील दुसऱ्या प्रकरणामध्ये संशोधन साहित्य सर्वेक्षण, सैधांतिक दृष्टिकोन, संशोधन पद्धती, संशोधन विषयाची निवड, अध्ययनाचे महत्व आणि व्याप्ती अध्ययन क्षेत्र संशोधन समस्या, संशोधन प्रश्न

संशोधनाचे तथ्य संकलन पद्धती, संशोधन आराखडा नमुना निवड पद्धत, क्षेंत्रीय अनुभव संशोधनाच्या मर्यादा प्रकरणाची रुपरेखा इत्यादी घटकांचा समावेश करण्यात येईल

प्रकरण तिसरे : स्वातंत्र्योकाळातील बंजारा नेतृत्व आणि राजकीय चळवळी :

वेगवेगळ्या चळवळीतील नेतृत्वाचा सहभाग यांचे लढे यांचा आढावा घेण्यात येणार आहे.

प्रकरण चौथे : बंजारा समाजातील प्रतिनिधीत्व

बंजारा समाजातील वर्तमान कालीन लोकसंख्या आणि त्यांना मिळालेले प्रतिनिधीत्व प्रकरण पाचवे : आरक्षण, प्रतिनिधित्व योग्य आहे का याचा आढावा घेण्यात येणार आहे.

प्रकरण साहावे : बंजारा समाजाच्या संविधानिक हक्काचे स्वरुप आणि त्यांच्या राजकीय समस्या

प्रकरण सातवे : निष्कर्ष आणि शिफारस

संदर्भ ग्रंथ

१) एनसकलोपिडिया ऑफ रिलीजन्स अँड इथिक्स, भाग २,पृक्र. ९६

२) उपरोक्त,पृक्र. २७

३) पाटील व्ही.बी., मानवी हक्क, के सागर पब्लीकेशन, पुण,पृक्र. १४

४) आगलावे प्रदीप, सामाजिक संशोधन, साईनाथ प्रकाशन,पृक्र.२०१०

५) जाधव सुर्यप्रकाश, पवार लक्ष्मण, (२०१७)
जमातीचे साहीत्य स्वरुप आणि दशा, शिवाजी प्रकाशन पुणे, पृ.१६

६) कुलकर्णी पी.के. (२०१२) दलित आणि आदिवाशी चे समाजशास्त्र, डायमंड पब्लीकेशन पुणे, पृक्र. २४

७) उपरोक्त पृ.क्र. ९४

८) माने लक्ष्मन उपरा (२०१०) ग्रंथाली प्रकाशन मुंबई

९) समाजशास्त्र संशोधन पत्रिका दिउसे.२०१३ पृ.क्र. ५ ते ५७

१०)लोकराज्य आक्टो (२००६) पृक्र. २४

संशोधक
राठोड मनोज भिकु
एम.ए.,सेट

मार्गदर्शक
डॉ.मानवत यु.एच
एम.ए.नेट. पीएच.डी.
बी.पी.ई.कॉलेज हानेगाव जि. नांदेड

Dr. Uttam H. Manwate
M.A., Ph.D.
Professor & Research Supervisor
Dept. of Political Science
B.P.E.G. Mahavidyalaya
Hanegaon Tq.Degloor Dist.Nanded